बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

निगमित संप्रेषण व निवेशक संबंध
प्रधान कार्यालय: लोकमंगल, शिवाजीनगर, पुणे-5
टेलि -020 :25614495, 25614366, 25514501 to 12 विस्तार. 495

वृत्तपत्रीय निवेदन

# महाराष्ट्र राज्याच्या राज्य स्तरीय बँकर्स समितीने कर्ज पोहोच कार्यक्रम आयोजित

पुणे ऑक्टोबर २८, २०२१ : राज्यस्तरीय बँकर्स समितीचे संयोजक असलेली बँक ऑफ महाराष्ट्र व अग्रणी बँक व्यवस्थापक, पुणे यांनी सार्वजनिक क्षेत्रातील अन्य संलग्न बँकांच्या सहकार्याने बालगंधर्व रंगमंदिर येथे दिनांक २७ ऑक्टोबर २०२१ रोजी कर्ज पोहोच कार्यक्रम आयोजित केला होता. सदर कार्यक्रमाच्या दरम्यान १०२ ग्राहकांना सुमारे रु १४२.६३ कोटी रुपयांची कर्जे मंजूर करून वितरीत करण्यात आली.

बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक श्री ए बी विजयकुमार हे सदर कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. भारत सरकारच्या अर्थ मंत्रालयाच्या निर्देशांनुसार असे कार्यक्रम देशभर आयोजित करण्यात येत असल्याचे श्री विजयकुमार यांनी नमूद केले. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी कर्जाच्या उचलीच्या प्रमाणात वाढ होण्यास अशा कार्यक्रमांमुळे मदत मिळते असेही श्री विजयकुमार म्हणाले. देशाच्या आर्थिक धोरणानुसार उगवत्या उद्योजकांना अधिक संख्येने कर्जे मंजूर करण्यावर त्यांनी भर दिला. महिला बचत गटांना अधिकाधिक कर्जे वितरीत करण्याचे आवाहन त्यांनी बँकांना उद्देशून केले. शासनाच्या सर्व योजना या सर्वसामान्य माणसाचे हित डोळ्यासमोर ठेऊन विचारपूर्वक तयार करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.

बँक ऑफ महाराष्ट्रचे सरव्यवस्थापक व पुणे शहर आंचल चे क्षेत्रीय व्यवस्थापक श्री राजेश सिंह यांनी सर्वांचे स्वागत केले. महाराष्ट्र राज्याच्या राज्य स्तरीय बँकर्स समितीचे संयोजक व बँक ऑफ महाराष्ट्रचे सरव्यवस्थापक श्री एम ए काबरा यांनी कार्यक्रमाची रूपरेषा थोडक्यात विशद केली.

पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा अधिकारी श्री अभिजित पाटील, बँक ऑफ इंडियाचे सरव्यवस्थापक श्री एम डी कुलकर्णी, कॅनरा बँकेचे सरव्यवस्थापक श्री सुबोध कुमार, पुणे जिल्ह्याचे अग्रणी बँक व्यवस्थापक श्री श्रीकांत कारेगावकर यांच्यासह १२ सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे वरिष्ठ अधिकारी तसेच अनेक शासकीय अधिकारी सुद्धा या कार्यक्रमास उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य स्तरीय बँकर्स समितीचे सदस्य सचिव श्री राजेश देशमुख यांच्या आभार प्रदर्शनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.




**फोटो मथळा:** श्री ए.बी. विजयकुमार , बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक पंधरा कोटींचा धनादेश युवा शक्ती फाउंडेशनच्या प्रतिनिधीला सुपूर्द करताना.

त्यांच्या उजवीकडे श्री एम ए काबरा, महाव्यवस्थापक आणि संयोजक, एसएलबीसी, महाराष्ट्र आणि श्री सुबोध कुमार, महाव्यवस्थापक, कॅनरा बँक.

त्यांच्या डावीकडे श्री राजेश सिंग, महाव्यवस्थापक आणि विभागीय व्यवस्थापक, बँक ऑफ महाराष्ट्र, पुणे शहर विभाग, श्री आर डी देशमुख, उप महाव्यवस्थापक आणि सदस्य सचिव, एसएलबीसी, महाराष्ट्र आणि श्री सूर्यकांत सावंत, महाव्यवस्थापक, एमएसएमई, बँक ऑफ महाराष्ट्र